SMBT

# Feb 2024 Month News Coverage

SMBT

# हृदय रोगावर मात केलेल्या मुलांसोबत वाढदिवसाचा गोडवा

## आ. बाळासाहेब थोरात यांना अविस्मरणीय क्षणाची अनुभुती

**नाशिक :** वाढदिवसाच्या निमित्ताने एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया झालेल्या बालकांसोबत वाढदिवस साजरी करण्याची संधी मिळाली याचे समाधान अधिक आहे. माझे वय ७१ वर्ष पूर्ण झाले. याआधी ७१ वाढदिवस झाले असतील पण एसएमबीटीच्या नंदी हिल्स कॅम्पसमधील हा वाढदिवस अविस्मरणीय राहील, असे गौरवोद्गार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आ. बाळासाहेब थोरात यांनी काढले.




एसएमबीटी नंदी हिल्स कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे, बोर्ड मेम्बर्स, एसएमबीटी संस्थेच्या विविध महाविद्यालये व हॉस्पिटलचे अधिष्ठाता, प्राचार्य, अधिकारीवर्ग यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. एसएमबीटी संस्थेतर्फे वेलनेस व्योयाग २०२४ मोहीम हाती घेण्यात आली. यासोबतच दर महिन्यात ३५ ते ४० लहान मुलांवर एसएमबीटी हार्ट इन्स्टीट्युटमध्ये मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया केल्या जात आहेत. त्यातील ३५ मुलांसोबत आमदार थोरात यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला.

दरम्यान, १९ डिसेंबर रोजी सुरू झालेली ५१ दिवसांच्या वेलनेस व्योयाग मोहिमेची आज सांगता झाली. एसएमबीटी परिवारातील ५०० पेक्षा अधिक सदस्यांनी ५४ टीम्सच्या माध्यमातून तब्बल १ लाख ११ हजार किलोमीटर अंतर पार केले. दररोज एका सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हे अंतर नोंदविले जात होते. दररोज किमान दोन किमी चालण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र अनेकांनी व्यायाम हा निरोगी आयुष्याचा मंत्र म्हणत दररोज ३० किमी पर्यत चालण्याचा अनोखा विक्रम केला. सहभागी झालेल्या प्रत्येकाला मेडल देऊन गौरविण्यात आले.

### मनमोकळ्या गप्पांचा आनंद

एसएमबीटीच्या गेटपासून कार्यक्रमस्थळी येण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांसोबत आमदार थोरात यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी हसत खेळत उत्तरे तर दिलीच शिवाय फोटोसेशन देखील केले.

पुण्य नगरी




# रुग्णालयाचा उद्देश सफल झाल्याचे समाधान

## आ. थोरात : हृदयविकारग्रस्त बालकांसमवेत वाढदिवस साजरा

**नाशिक :** ग्रामीण भागात अत्याधुनिक सेवा देणाऱ्या रुग्णालयाचे स्वप्न साकार होताना आपण बघतो आहोत. आज वाढदिवसाच्या निमित्ताने, हॉस्पिटलमध्ये मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया झालेल्या बालकांसोबत वाढदिवस साजरा करण्याची संधी मिळाली. या बालकांकडे पाहून रुग्णालयाचा उद्देश सफल झाल्याचे समाधान वाटते, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आ. बाळासाहेब थोरात यांनी केले.

एसएमबीटी नंदी हिल्स कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात आ. थोरात बोलत होते. याप्रसंगी व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे, बोर्ड मेम्बर्स, एसएमबीटी संस्थेच्या विविध महाविद्यालयांचे व हॉस्पिटलचे अधिष्ठाता, प्राचार्य, अधिकारी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी एसएमबीटी संस्थेच्या वतीने वेलनेस व्योयाग २०२४ मोहीम हाती घेण्यात आली.

यासोबतच दर महिन्यात ३५ ते ४० लहान मुलांवर एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया केल्या जात आहेत. त्यातील ३५ मुलांसोबत आ. थोरात यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला.

दि. १९ डिसेंबर रोजी सुरू झालेली ५१ दिवसांच्या वेलनेस व्योयाग मोहिमेची या कार्यक्रमात सांगता झाली. एसएमबीटी परिवारातील ५०० पेक्षा अधिक सदस्यांनी ५४ टीम्सच्या माध्यमातून तब्बल एक लाख ११ हजार किलोमीटर अंतर पार केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येकाला मेडल देऊन गौरविण्यात आले.

तसेच, यावेळी थोरात यांच्या हस्ते बेलाच्या झाडाचे रोपण करण्यात आले. आयुर्वेद हॉस्पिटल प्राचार्य डॉ. प्रदीप भाबड यांनी बेलाच्या झाडाबाबत माहिती दिली.

■ अनेक विद्यार्थ्यांसोबत आ. बाळासाहेब थोरात यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी हसत खेळत उत्तरे तर दिलीच; शिवाय अनेक विद्यार्थ्यांसोबत फोटोसेशन देखील केले.

Smart Nashik Edition
Feb 11, 2024 Page No. 04
Powered by: https://way2Smart.in/

# एसएमबीटी रुग्णालयाचा उद्देश सफल

## आमदार थोरात : हृदयरोगमुक्त चिमुकल्यांबरोबर वाढदिवस

■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ७ : ग्रामीण भागात अत्याधुनिक सेवा देणाऱ्या रुग्णालयाचे स्वप्न साकार होताना आपण पाहतो आहोत. वाढदिवसानिमित्त रुग्णालयात मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया झालेल्या बालकांबरोबर वाढदिवस साजरा करण्याची संधी मिळाल्याचे समाधान आहे. माझे वय आज ७१ वर्षे पूर्ण झाले. याआधी ७० वाढदिवस झाले असतील; पण 'एसएमबीटी'च्या नंदी हिल्स कॅम्पसमधील हा वाढदिवस अविस्मरणीय असल्याचे गौरवोद्‌गार माजी मंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व आमदार बाळासाहेब थोरात यांनी काढले.

एसएमबीटी नंदी हिल्स कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे, बोर्ड मेम्बर्स, एसएमबीटी संस्थेच्या विविध महाविद्यालये व हॉस्पिटलचे अधिष्ठाता, प्राचार्य, अधिकारी वर्ग यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दर महिन्यात ३५ ते ४० लहान मुलांवर एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया व प्रक्रिया होत आहेत. त्यातील ३५ मुलांबरोबर आमदार थोरात यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या या बालकांसह त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद या वेळी गगनाला भिडला होता. अनेक विद्यार्थ्यांबरोबर आमदार थोरात यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या वेळी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचा जीवनप्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला.




नाशिक : इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील एसएमबीटी रुग्णालयात हृदयरोगमुक्त चिमुकल्यांबरोबर वाढदिवस साजरा करताना आमदार बाळासाहेब थोरात.

### वेलनेस व्योयाग मोहिमेची सांगता

संस्थेकडून १९ डिसेंबरला सुरू झालेली ५१ दिवसांच्या वेलनेस व्योयाग मोहिमेची सांगता झाली. एसएमबीटी परिवारातील ५०० पेक्षा अधिक सदस्यांनी ५४ टीम्सच्या माध्यमातून तब्बल एक लाख ११ हजार किलोमीटर अंतर पार केले. दररोज एका सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हे अंतर नोंदविले जात होते. दररोज किमान दोन किलोमीटर चालण्याचे नियोजन केले होते. मात्र, अनेकांनी व्यायाम हा निरोगी आयुष्याचा मंत्र म्हणत दररोज ३० किलोमीटरपर्यंत चालण्याचा अनोखा विक्रम आपल्या नावे केला. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येकाला पदक देऊन गौरविले.

SMBT

SMBT

लोकमत



एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या भूमिपूजनप्रसंगी डॉ. रघुनाथ माशेलकर. समवेत आमदार बाळासाहेब थोरात, डॉ. पंकज चतुर्वेदी, डॉ एस. डी. बनवली, डॉ. सुधीर तांबे, ॲड. नितीन ठाकरे, डॉ. हर्षल तांबे, आशिमा मित्तल, डॉ. जयश्री थोरात आदी.

# 'एसएमबीटी मॉडेल' ठरणार देशात आदर्श

## डॉ. रघुनाथ माशेलकर : चार सेवांचा दिमाखात शुभारंभ

**सर्वतीर्थ टाकेद :** भारताला उत्तम तंत्रज्ञानाची व अत्याधुनिक उपचारांची आवश्यकता आहे. उपचार परवडणारे असलेच पाहिजेत; पण त्यात एक्सलन्स अधिक महत्त्वाचा भाग आहे. अत्याधुनिक उपचारांचे एसएमबीटी मॉडेल देशात आदर्श बनेल, असे प्रतिपादन प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

### कॅन्सर इन्स्टिट्यूटचे भूमिपूजन

एसएमबीटी केअर प्लस म्हणजेच २०० बेड्सचे सुसज्ज अशा स्पेशल रूमच्या विंगचे डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यानंतर याच विंगमध्ये असलेल्या बोन मॅरो ट्रान्सप्लांटचे उद्घाटन बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले. नव्याने बांधकाम होणाऱ्या एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटचा भूमिपूजन सोहळा याठिकाणी पार पडला. एसएमबीटी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मैदानावर टेलिहेल्थ आणि ई-कॅम्पसचे ऑनलाइन स्वरूपात उद्घाटन झाले.

एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट टाटा मेमोरियल सेंटर यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाने साकारल्या जाणाऱ्या विशेष सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा भूमिपूजन सोहळा आणि एसएमबीटी केअर प्लस, एसएमबीटी बोन मॅरो ट्रान्सप्लांट, एसएमबीटी टेलिमेडिसिन, एसएमबीटी ई-कॅम्पस या विविध सेवा उपक्रमांच्या शुभारंभप्रसंगी डॉ. माशेलकर बोलत होते. याप्रसंगी आमदार बाळासाहेब थोरात, माजी विधान परिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे, टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ. एस. डी. बनवली, डॉ. पंकज चतुर्वेदी, डॉ. राहुल पुरवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी विधानसभा सदस्य डॉ. सुधीर तांबे यांच्यासह डॉ. जयश्री थोरात यांनीही उपस्थितांना संबोधित केले. प्रास्ताविक एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांनी केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी जलज शर्मा, टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ एस. डी. बनवली, डॉ. पंकज चतुर्वेदी, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, इम्युनोॲक्टचे संस्थापक डॉ. राहुल पुरवार, मुख्यमंत्री साहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे, डॉ. हसमुख जैन, मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मेटच्या शेफाली भुजबळ, विजय करंजकर आदी मान्यवर उपस्थित होते.

Nashik Main
Page No. 4 Feb 29, 2024
Powered by: erelego.com

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

SMBT

# अत्याधुनिक उपचारांचे एसएमबीटी मॉडेल ठरणार देशात आदर्श : डॉ. माशेलकर

## एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूटचे शानदार भूमिपूजन; चार सेवांचा दिमाखात शुभारंभ

**नाशिक (प्रतिनिधी)–** भारताला उत्तम तंत्रज्ञानाची व अत्याधुनिक उपचारांची आवश्यकता आहे. उपचार परवडणारे असलेच पाहिजेत पण त्यात एक्सलन्स अधिक महत्त्वाचा भाग आहे. अत्याधुनिक उपचारांचे एसएमबीटी मॉडेल देशात आदर्श बनेल, असे प्रतिपादन प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूट टाटा मेमोरियल सेंटर यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाने साकारल्या जाणाऱ्या विशेष सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा भूमिपूजन सोहळा आणि एसएमबीटी केअर प्लस, एसएमबीटी बोन मॅरो ट्रान्सप्लांट, एसएमबीटी टेलीमेडिसीन, एसएमबीटी ई-कॅम्पस या विविध सेवा उपक्रमांच्या शुभारंभप्रसंगी डॉ.माशेलकर बोलत होते.

याप्रसंगी आमदार बाळासाहेब थोरात, माजी विधानपरिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे, टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ. एस. डी. बनवली, डॉ.पंकज चतुर्वेदी, डॉ.राहुल पुरवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ. माशेलकर पुढे म्हणाले रुग्णालय उत्तम दर्जाचे असले की ते महाग असते असे म्हटले जाते. मात्र, एसएमबीटी वेगळे हॉस्पिटल आहे, कमीत कमी दरात गुणवत्तापूर्ण उपचार द्यावयाचे आहेत सोबत एक्सलन्सदेखील टिकवून ठेवायचे असे ते म्हणाले. एसएमबीटी हॉस्पिटलने केलेल्या इम्युनोॲक्ट थेरपीच्या करारावर ते म्हणाले, ही सेवा ग्रामीण भागात मिळू लागल्यावर अनेक रुग्णांची सोय होणार आहे. एसएमबीटी हॉस्पिटल भारतासाठी नव्हे तर जगासाठी उत्तम उदाहरण होईल असे गौरवोद्गार डॉ. माशेलकर यांनी काढले. इम्यूनसेल बाहेर काढून ट्रेन केल्या जातात व या सेल परत आत पाठवून कॅन्सरच्या पेशींचा नाश करण्यास सक्षम केल्या जातात. भारताला उत्तम तंत्रज्ञानांची आणि तितक्याच चांगल्या उपचारांची आवश्यकता आहे. मी स्वत: मराठी शाळेत शिकलो पण काही बिघडले नसल्याचे ते म्हणतात उपस्थित मान्यवरांनी सभागृहात टाळ्यांचा कडकडाट केला.



नाशिक येथे एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूटच्या भूमिपूजनप्रसंगी पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, आमदार बाळासाहेब थोरात, टाटाचे डॉ. पंकज चतुर्वेदी, डॉ. एस. डी. बनवली, डॉ. सुधीर तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे, आशिमा मित्तल, डॉ.जयश्री थोरात आदी.

काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात म्हणाले , एसएमबीटी कॅम्पसमध्ये आजचा क्षण हा चिरस्मरणीय असा आहे. एसएमबीटीने एक नवा टप्पा गाठला आहे. देशातील दर्जेदार उपचार इथे होत आहेत याचा अभिमान आहे. एसएमबीटी केवळ हॉस्पिटल नसून १० ते १२ हजार लोकसंख्येचे गाव आहे. एसएमबीटीमुळे परिसरातील नागरिकांचे जीवनमान उंचावले आहे. एसएमबीटीने खूप नावलौकिक मिळवावा खूप पुढे जावे असे म्हणत येथे काम करणाऱ्या प्रत्येकाच्या कष्टाचे हे फळ असल्याचे याप्रसंगी आमदार थोरात म्हणाले. याप्रसंगी, माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांच्यासह डॉ जयश्री थोरात यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

प्रारंभी, एसएमबीटी केअर प्लस म्हणजेच २०० बेड्सचे सुसज्ज असे स्पेशल रूमच्या विंगचे डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याहस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यानंतर याच विंगमध्ये असलेल्या बोन मॅरो ट्रान्सप्लांटचे उद्घाटन- काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्याहस्ते झाले. यांनतर नव्याने बांधकाम होणाऱ्या एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूटचा दिमाखात भूमिपूजन सोहळा पार पडला. एसएमबीटी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मैदानावर टेलीहेल्थ आणि ई-कॅम्पसचे ऑनलाईन स्वरुपात उद्घाटन झाले.

प्रास्ताविक एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.हर्षल तांबे यांनी केले. त्यांनी एसएमबीटी हॉस्पिटलचा प्रवास उलगडत अनेक यशस्वी टप्प्यांबाबत सांगितले.

याप्रसंगी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा, टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ एस. डी. बनवली, डॉ पंकज चतुर्वेदी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, इम्युनोॲक्टचे संस्थापक डॉ.राहुल पुरवार, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे, कर्करोग तज्ञ डॉ. हसमुख जैन, मविप्रचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, मेटच्या शेफाली भुजबळ, विजय करंजकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### बोन मॅरो ट्रान्सप्लांट व कार-टी सेल थेरपीला सुरुवात

- सेल आणि जीन थेरपीमध्ये गेल्या दहा वर्षात खूप संशोधन झाले आहे. इतर देशात ही थेरपी सुरु आहे; मात्र तिथे खर्च खूप मोठा आहे. कमीत-कमी खर्चात भारतात असे संशोधन झालेले आहे. आजपासून इम्युनोॲक्ट थेरपी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे सुरु झाल्याचे इम्युनोॲक्टचे संस्थापक डॉ. राहुल पुरवार यांनी जाहीर केले. याआधी झालेल्या क्लिनिकल ट्रायलमध्ये दोन रुग्णांवर ही थेरपी यशस्वी करण्यात आली आहे.

### एसएमबीटी व टाटा उभारणार २०० खाटांचे हॉस्पिटल

- आज भूमिपूजन झालेले एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूटमध्ये टाटा मेमोरियल सेंटरच्या तांत्रिक मार्गदर्शनाने २०० बेड्सचे सुसज्ज हॉस्पिटल लवकरच साकारले जाणार आहे. टाटा मेमोरियल सेंटरचे डॉ.पंकज चतुर्वेदी यांनी एसएमबीटी वटवृक्ष असल्याचे म्हणत यापुढे सर्वकाही सहकार्य एसएमबीटीसाठी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दोन वर्षांपूर्वी जेव्हा करार झाला त्यानंतर वाटले नव्हते एसएमबीटी एवढे मोठे काही करू शकेल, असे म्हणत टाटा मेमोरियल सेंटरपेक्षाही मोठे हॉस्पिटल एसएमबीटी होऊ शकते असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

Sarwamat Edition
Feb 29, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**SMBT**

लोकमत

मीनल मोहगावकर : 'आयएमए'तर्फे 'ओमनीकॉन २०२४'चे आयोजन

# वैद्यकीय शिक्षणात विद्यार्थ्यांना आता पाच कुटुंबे दत्तक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** वैद्यकीय शिक्षणात २०१८ सालापासून आमूलाग्र बदल झालेले आहेत. यामध्ये वैद्यकीयच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रम कालावधीत ५ कुटुंबे दत्तक घेताना त्यांचे निरीक्षण करण्याचा समावेश आहे. फ्लिप क्लासरुमसोबत विविध नवीन संकल्पनांचा समावेश झालेला आहे. ७० टक्के अभ्यासक्रम वैद्यकशास्त्राविषयी तर ३० टक्के व्यवहार, संवाद कौशल्ये विकासावर आधारित असल्याची माहिती 'एसएमबीटी'च्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर यांनी दिली.



ओमीकॉन परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. मीनल मोहगावकर. समवेत डॉ. विशाल गुंजाळ, डॉ. माधवी गोरे-मुठाळ, डॉ. अनुप भारती, डॉ. नीलेश जेजूरकर आदी.

इंडियन मेडिकल असोसिएशन नाशिक शाखेच्यावतीने आयएमए हॉल येथे रविवारी (११ फेब्रुवारी) आयोजित 'ओमनीकॉन २०२४' परिषदेप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. वसंतराव गुप्ते ओरेशनअंतर्गत 'वैद्यकीय शिक्षण आणि त्यात होत असलेले बदल' याविषयी त्यांनी माहिती दिली.

आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ, उपाध्यक्षा डॉ. मनीषा जगताप, परिषदेचे समन्वयक डॉ. पंकज भट, डॉ. सागर भालेराव, डॉ. किरण शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. मोहगावकर म्हणाल्या, नॅशनल मेडिकल कमिशनमार्फत नवनवीन नियमावली जाहीर केली जात असते. काही वर्षांपूर्वीपर्यंत वैद्यकिय अभ्यासक्रमांतील प्रवेश संख्या कमी होती. देशातील वैद्यकीय शिक्षण जगभरातील इतर देशांच्या तुलनेत मागे होते. परंतु २०१८ मध्ये वैद्यकिय शिक्षणात आमूलाग्र बदल केलेले आहेत.

आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ म्हणाले, सर्वसमावेशक परिषद असावी, या उद्देशाने सत्रांचे नियोजन केले असून, इतर शहरांतील तज्ज्ञांची व्याख्याने घेण्याऐवजी नाशिकच्या वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गजांना प्राधान्य दिले. वर्षभरातील कामाचा आढावा त्यांनी घेतला. हॉस्पिटल रजिस्ट्रेशनचा विषयांचा पाठपुरावा केल्याचे सांगितले.

### रुग्णाचा इतिहास समजल्यास उपचार करणे सोपे

- पहिल्या सत्रामध्ये डॉ. शिरीष देशपांडे यांनी रुग्णावर उपचार करतांना त्यांचा पूर्व इतिहास समजून घेतल्यास उपचार करणे सोपे होते, असे सांगितले. डॉ. विजय काकतकर यांनी शस्त्रक्रिया करताना पूर्व तयारी, शस्त्रक्रियादरम्यान घ्यायची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.
- आयव्हीएफ उपचारासंदर्भात डॉ. प्रियांका कासलीवाल यांनी माहिती दिली. ऑन्कोलॉजी उपचारांबाबत डॉ. भूषण नेमाडे यांचे तर डॉ. मिलिंद पिंपरीकर यांचे स्पोर्ट्स एज्युरी आणि फिटनेस या विषयावरील सत्र झाले.
- डॉ. राजेंद नेहेते यांनीही संवाद साधला. आभार आयएमए नाशिकच्या सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ यांनी मानले. समिती सदस्य डॉ. अनुप भारती, डॉ. नीलेश जेजूरकर यांच्यासह इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सर्वसमावेशक वैद्यकीय शिक्षण ठरेल प्रभावी

## डॉ. मीनल मोहगावकर : 'आयएमए'तर्फे ओमनीकॉन परिषद

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ११ : काही वर्षांपासून वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये वाढ झाली आहे. तसेच २०१८ मध्ये वैद्यकीय शिक्षणात महत्त्वाचे बदल झाले. सध्याच्या परिस्थितीत संभाव्य आव्हानांचा अंदाज घेताना वैद्यकीय शिक्षणात सर्वसमावेशकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. नियमित विषयांबरोबर दृष्टिकोन, नीतीमूल्ये, संवाद कौशल्ये यांच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे प्रतिपादन 'एसएमबीटी'च्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर यांनी रविवारी (ता. ११) केले.

शालिमार येथील आयएमए सभागृहात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नाशिक शाखेतर्फे झालेल्या 'ओमनीकॉन-२०२४' परिषदेप्रसंगी त्या बोलत होत्या. 'वैद्यकीय शिक्षण आणि त्यात होणारे बदल' याविषयी त्यांनी माहिती दिली. 'आयएमए' नाशिकचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ, उपाध्यक्षा डॉ. मनीषा जगताप, परिषदेचे समन्वयक डॉ. पंकज भट, डॉ. सागर भालेराव, डॉ. किरण शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. मोहगावकर म्हणाल्या, की नॅशनल मेडिकल कमिशनमार्फत वेळोवेळी नवीन नियमावली जाहीर केली जाते. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत प्रत्येकाने वैद्यकीय सेवेदरम्यान या धोरणांविषयी अद्ययावत राहावे. 'वैद्यकीय'च्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रम कालावधीत पाच कुटुंब दत्तक घेताना त्यांचे निरीक्षण करण्याचा समावेश आहे. फ्लिप क्लास रूमसह इतर नवीन संकल्पनांचा समावेश आहे. ७० टक्के अभ्यासक्रम वैद्यकशास्त्र आणि उर्वरित ३० टक्के अभ्यासक्रमात इतर आवश्यक कौशल्यांच्या विकासावर आधारित आहे.



**शालिमार** : 'आयएमए'तर्फे रविवारी आयोजित ओमनीकॉन परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी पदाधिकारी.

'आयएमए' नाशिकचे अध्यक्ष डॉ. गुंजाळ म्हणाले, की परिषदेसाठी सहाशे डॉक्टरांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इतर शहरांतील तज्ज्ञांची व्याख्याने घेण्याऐवजी नाशिकच्या वैद्यकीय क्षेत्रातील दिग्गजांना प्राधान्य दिले. डॉ. देशपांडे म्हणाले, की डॉक्टरांनी सुसंवाद साधावा. रुग्णावर उपचार

नवराष्ट्र

SMBT

### आयएमएतर्फे आयोजित ओमनीकॉन परिषदेत डॉ. मीनल मोहगावकर यांचे प्रतिपादन

# वैद्यकीय शिक्षणात सर्वसमावेशकता

नाशिक, (वा.) काही वर्षांपूर्वीपर्यंत वैद्यकीय अभ्यासक्रमांतील प्रवेश संख्या कमी होती. तसेच देशातील वैद्यकीय शिक्षण जगभरातील इतर देशांच्या तुलनेत मागे होते, परंतु २०१८ मध्ये वैद्यकीय शिक्षणात अमुलाग्र बदल केलेले आहेत. काळानुरूप वैद्यकीय शिक्षणात सर्वसमावेशकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. नियमित विषयांसोबतच दृष्टीकोन, नितीमूल्ये, संवाद कौशल्ये विकासावर भर दिला जात असल्याची माहिती एसएमबीटीच्या अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर यांनी दिली.

इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नाशिक शाखेच्या वतीने शालिमार येथील आयएमए हॉल येथे रविवारी (दि.११) आयोजित 'ओमनीकॉन-२०२४' परिषदेप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. वसंतराव गुप्ते ओरेशनअंतर्गत 'वैद्यकीय शिक्षण आणि त्यात होत असलेले बदल' याविषयी त्यांनी माहिती



## धोरणांविषयी अद्ययावत राहण्याची गरज

याप्रसंगी आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ, उपाध्यक्षा डॉ. मनिषा जगताप, परिषदेचे समन्वयक डॉ. पंकज भट, डॉ. सागर भालेराव, डॉ. किरण शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे उपस्थित होते. डॉ. मोहगावकर म्हणाल्या, नॅशनल मेडिकल कमिशनमार्फत नवनवीन नियमावली जाहीर केली जात असते. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत प्रत्येकाने वैद्यकीय सेवा देत असतांना या धोरणांविषयी अद्ययावत राहिले पाहिजे. वैद्यकीय शिक्षणात २०१८ सालपासून अमुलाग्र बदल झालेले आहेत. यामध्ये वैद्यकीयच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रम कालावधीत ५ कुटुंब दत्तक घेतांना त्यांचे निरीक्षण करण्याचा समावेश आहे. ७० टक्के अभ्यासक्रम वैद्यक शास्त्राविषयी असून, उर्वरित ३० टक्के अभ्यासक्रमात व्यवहार कौशल्ये, संवाद कौशल्ये व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत राहातांना इतर आवश्यक कौशल्यांच्या विकासावर आधारित आहे. आभार डॉ. माधवी गोरे-मुठाळ यांनी मानले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी